# दि. ३०/०१/२०१५ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे इतिवृत्त

दिनांक ३०.०१.२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजीत जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती ठरल्या प्रमाणे मा. अध्यक्षा जि. प. यवतमाळ यांचे अध्यक्षते खाली घेण्यात आली, सभेस खालील प्रमाणे सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सर्वश्री / श्रीमती**

१. मा. सौ. आरतीताई फुपाटे, अध्यक्षा जिल्हा परिषद यवतमाळ
२. मा. श्री. सुभाषभाऊ ठोकळ, सभापती अर्थ व बांधकाम जिल्हा परिषद यवतमाळ
३. मा. श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे, सभापती शिक्षण व आरोग्य जिल्हा परिषद यवतमाळ
४. मा. सौ. लताताई खांदवे, सभापती समाजकल्याण जिल्हा परिषद यवतमाळ
५. मा. सौ. विमलताई चव्हाण सभापती महीला व बाल कल्याण जिल्हा परिषद यवतमाळ
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
७. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
८. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जिल्हा परिषद यवतमाळ
९. मा. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ

**इतर आमंत्रित अधिकारी / कर्मचारी**

१. श्री. अ. रफीक कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. विभाग यवतमाळ
२. श्री. ए.एम. आडे उपकार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
३. श्री. अ.वि. लोखंडे उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग दारव्हा
४. श्री. ए. एस. बोबडे उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग राळेगाव
५. श्री. ए.टी. पदमावार उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग पांढरकवडा
६. श्री. के.एम. मानकर उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग यवतमाळ
७. श्री. डी.पी. चौधरी उपअभियंता (यां.) यांत्रिकी उपविभाग यवतमाळ
८. श्री. एन.एम. राठोड R.F.O. उपवनसंरक्षक वनविभाग पांढरकवडा
९. श्री. विश्वास वाल्दे वरिष्ठ भुवैज्ञानिक भ.सं.वि.यं. यवतमाळ
१०. श्री. एच. व्ही. बन्सोड क.अभि. पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
११. श्री. नितिन शहाडे क.अभि. पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
१२. श्री. एस. टी. शेंडे म.जी.प्रा. उपविभाग यवतमाळ
१३. श्री. अ.ना. निसाळ सिंचन विभाग जि.प. यवतमाळ
१४. श्री. एस.एन. निलावार मध्यम प्रकल्प विभाग यवतमाळ
१५. श्री. एच.एम. कठारे क.भुवै. पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
१६. श्री. एच.एस. वाळके क.अभियंता पा.पु. उपविभाग राळेगाव

१७.श्री. पी. आर. कुरळकर क.अभि. पा.पु. उपविभाग राळेगाव
१८. श्री. आर. बी. खोडे सहा. अभियंता यवतमाळ
१९. श्री. भा.ब. पोटे तंत्र अधिकारी जि.प.यवतमाळ कृ.अ.
२०. श्री. पी.पी. राऊत स्विय. सहाय्यक
२१. कु. वंदना ढवळे स्वच्छ भारत मिशन
२२. श्री. उत्तम बेजलवार स्विय. सहाय्यक सभापती अर्थ व बांधकाम
२३. श्री. पी. के. भोंग स्वािय सहाय्यक अध्यक्षा जि.प. यवतमाळ

*******

सर्व प्रथम अति. मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांचे प्रतिनिधीनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष यांचे अुनमतीने सभेचे कामकाजास खालील प्रमाणे सुरवात केली.

**विषय क्रमांक ०१ :- दिनांक ०६/०१/२०१५ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत कायम करण्यास मान्यता प्रदान करणे.**

**ठराव क्रमांक ०१ :- दिनांक ०६/०१/२०१५ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत कायम करण्यास ही ०समिती मान्यता प्रदान करते.**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**विषय क्रमांक ०२ :- नळ योजनांना विद्युत पुरवठा करणे बाबत कार्यवाहीचा आढावा.**

उपरोक्त विषयांचा आढावा घेतांना मा. सभापती शिक्षण व आरोग्य यांनी मागील सभेस विद्युत पुरवठा बाबत माहिती देण्यात आलेली होती, मौजा सिंगलदिप, खंडणी, मेंढणी हे Infra -०२ मध्ये असल्यामुळे सदर कामाचा कंत्राट पॅसेज फर्म ला कामे देण्यात आली असुन , सदर कामे दिड महिण्याच्या कालावधी मध्ये होईल असे सांगण्यात आले. परंतु अद्याप यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही तसेच याला आणखी कीती दिवस लागणार आहेत अशी विचारणा केली. यावर म.रा.वि.म प्रतिनिधीने मटेरीयल टेस्टींगचे काम सुरु आहे. एका महीण्यात काम सुरु होईल असे सांगीतले.

**विषय क्रमांक ०३ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा म.जी.प्रा. चे प्रतिनिधीने सभेत सादर केला.

मा.अध्यक्ष यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा घेतांना मारेगाव येथील योजनेचे कामा बाबत माहीती विचारली असता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा चे

प्रतिनिधिने सदर काम प्रगतीपथावर आहे, ७० % काम पुर्णझालेले आहे, फक्त पंप हाऊसचे काम शिल्लक आहे ३० % काम बाकी आहे, व काम पुर्ण होण्यास आणखी दिड महीणा लागणार असल्याचे सांगीतले. यावर मा. अध्यक्ष यांनी कंत्राटदार काम व्यवस्थीत करीत नसेल तर त्याला दंडात्म कार्यवाही करणे बाबत पत्र द्या व तशी कार्यवाही करणे बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर उपकार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग यांनी दिनांक २०.०१.२०१५ रोजी झालेल्या वार्षीक कृती आराखडा २०१५-१६ च्या संदर्भात मा. प्रधान सचिव यांनी दिलेल्या सुचनांनुसार वार्षीक कृती आराखडा मध्ये नविन गावे घेण्यात येऊ नये या बाबत सुचनांचे वाचन केले.

त्यांनतर मागील सभेत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरिष्ठ भुवैज्ञानिक यांच्या मार्फत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचे सर्वेक्षण होणेबाबत वारंवार पाठपूरावा करण्यात यावा, तसेच वरिष्ट भुवैज्ञानिक यांच्या मार्फत स्त्रोत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले होते. त्या बाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी मा. अध्यक्ष यांनी विचारणा केली यावर का.अ. ग्रामीण पाणी पुरवठा विभागा यांनी ७० गावाची यादी वरिष्ठ भुवैज्ञानिक यांना देण्यात आली होती परंतु वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी सदर यादी कोणताही सर्वेक्षण न करता परत केली आहे. त्यामुळे आता कनिष्ठ भुवैज्ञानिक पाणी पुरवठा विभाग हे सर्वे करीत असल्याचे सांगीतले. यावर मा. अध्यक्ष यांनी जे सर्वे नोव्हें. २०१४ मध्ये पुर्ण व्हायला पाहीजे होते ती अद्यापही पुर्ण झालेली नाही या बाबत नाराजी व्यक्त केली व सर्वे न करण्याची कारणे विचारली यावर वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी सर्वे करीता वाहन उपलब्ध नसल्यामुळे मी सर्वे करु शकलो नाही असे सांगीतले. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी अद्याप कामे पुर्ण का केली नाही, या विषयावर तुमच्या वरिष्ठां सोबत दुरध्वनी व्दारे चर्चा झाली तेव्हा तं म्हणाले तुम्ही कामे केली पाहीजे. मग तरीही सर्वे का पुर्ण झाले नाही. या नंतर मी कोणतेही कारण ऐकणार नाही तुम्ही कामे केली पाहीजेत असे निर्देश वरिष्ठ भुवैज्ञानिक यांना दिले.

त्यानंतर चिंचमंडल ता.मारेगाव येथील योजनेचे स्त्रोताच्या बाबतीत सविस्तर चर्चा झाली यावर मा. सभापती शिक्षण व आरोग्य यांनी जुनी नळ योजना सुरु आहे, पाणी पुरवठा सुरु आहे. मग त्यालाच दुरुस्त करा कींवा नदीवरुन योजना घ्या असे सांगीतले. यावर उपअभियंता वणी यांनी सदर योजनेची स्ट्रेंच गॅलरी बुजली आहे व रु. ३ लक्ष एवढा खर्च लागणार असल्याचे सांगीतले. यावर कार्यकारी अभियंता पा.पु. यांनी टंचाई अंतर्गत आराखडयात समावेश करण्या बाबत उपअभियंता व गटविकास अधिकारी यांचे मार्फत कार्यवाही करावी लागेल असे सांगीतले. यावर मा. अध्यक्षा यांनी अश्या योजनांची विशेष दुरुस्ती बाबत खर्च कश्या मधून करता येईल त्या मधुन करा अश्या सुचना दिल्या.

~~बिहाडी पोड~~